Please Consider the Environment Before Printing… **Date: 11/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## सशस्त्र क्रांतिकारक राम प्रसाद बिस्मिल



राम प्रसाद बिस्मिल हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांचा जन्म ११ जून १८९७ रोजी उत्तर प्रदेशमधील शाहजहांपूरमध्ये झाला. आजुबाजूच्या सामाजिक पुराणमतवादामुळे अस्वस्थ झालेले बिस्मिल हे अगदी लहान वयातच एक अतिशय श्रद्धाळू आर्य समाजी बनले आणि त्यांचे गुरू स्वामी सोमदेव यांच्या प्रभावाखाली ब्रिटिश साम्राज्यविरोधी संघर्षात ओढले गेले. स्वामी सोमदेव यांनी बिस्मिल यांना इटालियन देशभक्त मॅझीनी आणि इतर साथींच्या लिखाणाची ओळख करून दिली. बिस्मिल यांनी १९१६ च्या लखनौतील काँग्रेसच्या अधिवेशनात हजेरी लावली आणि त्यांचा संपर्क मातृवेदी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रिटिशविरोधी भूमिगत क्रांतिकारक संघटनेशी झाला. त्याच वर्षी त्यांनी 'अमेरिका को स्वाधीनता कैसे मिली' हे पुस्तक प्रकाशित केले, ज्यामध्ये त्यांनी एखाद्या देशाला प्रगत होण्यासाठी राजकीय स्वातंत्र्य गरजेचे आहे आणि ते मिळविण्यासाठी सशस्त्र संघर्ष सर्वात जास्त व्यवहार्य पर्याय आहे, अशी भूमिका मांडली.

१९१८ मध्ये त्यांनी 'देशवासीयो के नाम संदेश' हे पत्रक प्रकाशित केले, ज्यामध्ये ब्रिटिशांविरुद्ध सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकत्र होऊन लढावे असे आवाहन केले. १९२० मध्ये त्यांनी 'सुशील माला' नावाने प्रकाशनगृह सुरू केले आणि 'बोलशेविकों की करतूत' प्रकाशित केले तसेच 'मन की लहर' कवितासंग्रह आणि कॅथरीन या रशियन समाजवादी क्रांतिकारक, कॅथरीन ब्रेशकोव्हस्की यांचे चरित्र प्रसिद्ध केले. असहकार चळवळीच्या वेळी त्यांनी 'स्वदेशी रंग' नावाचा कवितासंग्रह छापला. ९ ऑगस्ट, १९२५ रोजी बिस्मिल यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांनी लखनौजवळ काकोरी येथे रेल्वे थांबवून सरकारी तिजोरी लुटली. यातून मिळालेला निधी जर्मनीकडून शस्त्रे घेण्यासाठी वापरण्यात येणार होता. त्यानंतर बहुतेक एचआरए नेत्यांना अटक करण्यात आली आणि त्यापैकी बिस्मिल यांच्यासह ४ जणांना १९ डिसेंबर १९२७ रोजी ब्रिटिशांनी फाशी दिली.

Nashik Edition

Jun 11, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

■ **सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव :** कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
>
> \- **रूपेश दराडे,** संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3